ई-मेल द्वारे

**जिल्हा व सत्र न्यायालय, अहमदनगर**

---

संदर्भ : दिनांक ०५/१२/२०२४ रोजी प्रसिध्द झालेली '**कनिष्ठ लिपिक**' पदाकरीताची प्रतिक्षा यादी.
संदर्भ : जिल्हा न्यायालय, अहमदनगर आदेश क्र.बी-०४/आस्था.२९६५/२०२५, दि.३०/१०/२०२५

---

**आ दे श :-**

**क्रमांक बी-०४/आस्था.१९१६/२०२५** :- प्रमुख जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर हे खालीलप्रमाणे नविन नेमणूकीचा आदेश पारित करीत आहेत. **सदरचा आदेश दिनांक ०१/११/२०२५ रोजी मध्यान्हपूर्व पासून अंमलात येईल.**

| अ. क्र. | उमेदवाराचे नाव, प्रतिक्षा यादीतील अनुक्रमांक व पत्ता. | नविन नेमणूकीचे ठिकाण. |
|---|---|---|
| १) | श्रीमती आश्विनी गणेश लाटे, कनिष्ठ लिपिक पदाच्या प्रतिक्षा यादीवरील उमेदवार **क्रमांक ८**, राहणार मु. दापका, पो. लांबोटा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर ४१३ ५२१. | तात्पुरत्या स्वरुपात नविन नेमणूकीने 'कनिष्ठ लिपिक' म्हणून जिल्हा न्यायालय, संगमनेर येथे श्रीमती शामल शशिकांत शिंदे यांच्या तांत्रिक राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या पदी. |

**टिप :-**

| | |
|---|---|
| १) | उपरोक्त उमेदवारांची नेमणूक ही सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक चारित्र-२०१७/प्र.क्र. ४८३/२०१७/१६-अ, दिनांक २८ ऑगस्ट २०१७ नूसार उमेदवाराची चारित्र व पूर्वचारित्र याची पडताळणीच्या अधीन राहून करण्यात येत आहे. **उमेदवाराने सादर केलेली माहिती असत्य आढळून आल्यास प्रस्तुतचा नियुक्ती आदेश रद्दबातल करुन भारतीय दंडसंहितेनूसार फौजदारी कारवाई तसेच शासन सेवेत कायमस्वरुपी अपात्र ठरविण्यात येईल.** |
| २) | कनिष्ठ लिपिक म्हणुन नविन नेमणूक दिलेल्या कर्मचा-यांची **वेतन स्तर-एस ६** (१९९००-६३२००) मध्ये नेमणूक करणेत येत आहे. |
| ३) | त्यांना सुचित करणेत येते की, त्यांना दिलेली नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरूपाची असुन त्यांना कोणतेही कारण न देता व नोटीस न देता केव्हाही सेवेतुन कमी करणेत येईल. तसेच, हजर झालेनंतर त्यांना त्यांचे पदाचा राजीनामा दयावयाचा असल्यास, एक महिन्याची आगावू लेखी नोटीस अथवा एक महिन्याचे मुळ वेतन इतकी रक्कम भरावी लागेल. |
| ४) | तसेच त्यांना असेही सुचित करणेत येते की, ते नेमणुक दिलेल्या न्यायालयात **दिनांक ०१/११/२०२५ रोजीपासून सात दिवसांचे** आत हजर न झाल्यास त्यांना देण्यात आलेली नियुक्ती रद्द करण्यात येईल व त्यांचे निवड यादीतील नाव कमी करण्यात येईल, याची नोंद घ्यावी |
| ५) | उपरोक्त कर्मचा-यांचा हजर झालेबाबतचा अहवाल त्वरीत **ईमेल द्वारे** पाठविण्यात यावा |

( अंजु शेंडे )
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
**अहमदनगर**

जिल्हा न्यायालय, अहमदनगर, ))
दिनांक : ३०/१०/२०२५. ))

**क्रमांक बी-०४/आस्था.१९१६/२०२५**

**प्रत माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषीत :-**

१) माननीय जिल्हा न्यायाधीश-१, संगमनेर.
२) अधीक्षक, कार्यव्य/ले.व वि., जिल्हा न्यायालय, अहमदनगर.
३) जिल्हा प्रणाली व्यवस्थापक यांनी प्रस्तुतचा आदेश कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावा.
४) संबंधित कर्मचारी यांना त्यांचे ई मेल द्वारे.
५) कार्यालयीन संचिका.

( एस. एस. उलाने )
प्रबंधक, जिल्हा न्यायालय,
अहमदनगर

जिल्हा न्यायालय, अहमदनगर, ))
दिनांक : ३०/१०/२०२५. ))